# एप्रिल फूल

प्रकाशित:

**रत्नाकर वाणी**

पुनरारंभ

© पुनरारंभ

website: http://www.rajratna.co.in Email: ratnakar.wani@rajratna.co.in

# एप्रिल फूल

मार्च संपत आला की एप्रिलचे वेध लागतात. एक एप्रिल अर्थात एप्रिल फूल. या दिवशी एकमेकास फसवून एप्रिल फूल बनविण्यात आनंदच वेगळाच असतो. फसविल्यावर 'कसे फसविले' या अविर्भावात क्षणैक आनंद उचलण्यात लहानांपासून थोरांपर्यंत सर्वच सहभागी होतात. यात जो तो आपापल्या परिने एप्रिल फूल बनवित असतो.

लहान मुले आपल्या बाल मित्राच्या मागे काही नसतांना "अरे बघ! तुझ्या मागे काय आहे? " अशी त्यांच्या परिने खोटी विधाने करून एप्रिल फूल बनवितात. समोरचा पण काही कमि नसतो. थोडयावेळाने तो "तुला तुझ्या आईने बोलाविले" असा खोटाच निरोप देतो. आईचे बोलविणे प्रामाणिकपणे स्विकारून घरी जातो व आई नाही म्हणल्यावर आपण एप्रिल फूल बनल्याचे समजून जातो. अशा अनेक प्रकारे बालचमु एकमेकास एप्रिलफूल करून आनंद घेत असतात. यात मोठेपण काही कमि नसतात. ते दुस-याच्या नावे रिकामे पाकिट पाठवून एप्रिल फूल बनविल्याचा आनंद घेतात.

मला मात्र एप्रिल आला की बालपणी मी केलेल्या खोडया आठवतात. त्यावेळी मी ७वी इयत्तेत शिकत होतो. परवा आमच्या शेजा-यांनी पाठविलेल्या शेवग्याच्या शेंगा पाहून मी बालपणी आमचे शेजारी कुळकर्णी काकूना कसे फसविले याची आठवण झाली.

अहमदनगर जिल्हयात, कोपरगाव तालुक्यातील साकरवाडी येथे दि गोदावरी शुगर मिल्स लि. साखर कारखाना होता. कारखान्याचे जवळच अधिकारी व कर्मचारी यांची वसाहत होती. आमचे भागात केवळ दोनच ठिकाणी शेवग्याच्या शेंगांचे झाड होते. एक आमचे अंगणात व दुसरे आमचे शेजारी श्री. पी. आर. आठवले यांचे अंगणात. आमचे कडील झाडास गोड शेंगा लागायच्या तर शेजारच्या झाडास कडू शेंगा लागायच्या. दोन्ही झाडांना भरपूर बहर यायचा व शेंगा पण तशाच लागायच्या. साधारण रविवारी संध्याकाळी आम्ही झाडावरच्या शेंगा उतरवून व शेजा-यांना देत असू.

अशाच एका रविवारी एक एप्रिल तारीख आली असता शेर्जायांना एप्रिल फूल बनवावे असे मनी आले. संध्याकाळचे ऐवजी सकाळीच शेजारचे झाडावरून कडू शेंगा उतरवल्या व शेजारच्या कुळकर्णी काकूंना नेहमी प्रमाणे दिल्या. सकाळीच शेंगा आल्याने काकुंनी आश्चर्य करित विचारले, "अरे, आज सकाळीच शेंगा कशा? नेहमी तर संध्याकाळी उतरवतात." त्यावर मी खुबीने उत्तर दिले "आम्ही आज संध्याकाळी श्रीरामपूरला जात आहोत."

काकूंनी लगेच ताज्या शेंगाची भाजी केली व कडू लागताच फेकून दिली. हे सर्व मी पाहत होतो. संध्याकाळी मला काकू म्हणाल्या “शेंगा कडू होत्या.” मी हसत म्हणालो, “काकू आज एक एप्रिल नाही का? "एप्रिल फूल."

या प्रमाणेच आमचे वसाहतीमध्ये कंपनीच्या दवाखान्यात विनोदी स्वभावाचे व मुलांमध्ये मिसळणारे श्री.पळशीकर काका नामक कंपाउंडर होते. त्यांना मुले प्रिय होती. मुले दवाखान्यात गेले की, म्हणायचे “आता तुझे नाकाला भोक पाडणार. कानातून हवा काढणार” वगैरे वगैरे. असे विनोद आमचे सोबत करित असत. या बरोबर सरबता सारखे गोड औषध व जेलुसिलच्या गोड गोळया पण देत.

एक एप्रिललाच एप्रिल फूल करणेची त्यांना लहर आली व त्यानी आम्हास चांदीचे वेष्टनात चॉकलेटच्या आकाराचे कणकेचे गोळे गुंडाळून चॉकलेट म्हणून दिले व आम्हास एपिल फूल केले. त्यावेळी दवाखान्याची महिनाभराची औषधी वेळी अवेळी केव्हाही यायची व काका पण कोणताही कंटाळा न करता ड्युटी फर्स्ट समजून ताब्यात घेण्यासाठी दवाखान्यात जायचे. संध्याकाळी ७.00 वाजता औषधी आली आहे व ती ताब्यात घेण्यासाठी बोलाविले असा खोटा निरोप आम्ही त्यांना दिला. ते पण काही विचार न करता दवाखान्यात आले. आम्ही मुले एकदम एप्रिल फूल असे ओरडलो. त्यावर ते हसत म्हणाले, “अरे लबाडांनो, मला एप्रिल फूल करता काय?” अशी प्रेमळ प्रतिक्रीया व्यक्त करित घरी परतले. जातांना ते उद्या त्यांची कन्या सविताताईच्या वाढदिवसानिमित्त घरी येण्याचे निमंत्रण देण्यास विसरले नाही.

अजूनही ज्या ज्या वेळी मी साकरवाडीला जातो. तेव्हा बालपणीच्या आठवणी व सर्व घटना जागृत होतात व डोळया समोर जशाच्या तशा उभ्या ठाकतात. देवाला दान मागायचे झाल्यास मी एकच मागेन “बालपण देगा देवा तुझा विसर न व्हावा”.